# जिल्हा परिषद,अमरावती

**सामान्य प्रशासन विभाग, कॅम्प परिसर अमरावती ४४४६०२**

**दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२०१२२** **Email ID: dyceogadzpamt@gmail.**


**क्रमांक/जिप/साप्रवि/परिपत्रक/४३३४/२०२६**
**कार्यालय,जिल्हा परिषद अमरावती**
**(सामान्य प्रशासन विभाग)**
**दिनांक :- ६ एप्रील २०२६**

**संदर्भ - आज दिनांक ६ एप्रील २०२६ रोजी जि.प.परिसरातील कार्यालयातील आकस्मिक पाहणी.**

**परिपत्रक**

जिल्हा परिषद कार्यालय अमरावती अंतर्गत येणारी सर्व कार्यालये व पंचायत समिती स्तरावरील सर्व कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांचे लक्ष वेधून घेण्यात येते की, कार्यालयीन वेळेत तसेच कार्यालयाच्या परिसरात काम करतांना व कार्यालयीन कामानिमित्त दौऱ्यावर असतांना ओळखपत्र (Identity Card) गळयात परिधान करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे काही अधिकारी त्यांचे जागेवर आढळून आले नाही व त्यांचे कार्यालयातील अन्य कर्मचा-यांना सुध्दा ते कुठे गेले याबाबत माहिती नसल्याचे दिसुन आले.या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना खालील प्रमाणे सुचना वजा निर्देश दिले जात आहे.

१. जिल्हा परिषद अमरावती व अंतर्गत येणारी सर्व कार्यालये तसेच पंचायत समिती स्तरावरील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना ओळखपत्रे परिधान करणे याव्दारे सक्तीचे करण्यात येत आहे.
२. ज्या कर्मचा-यांकडे अद्याप ओळखपत्र नाही,त्यांनी तात्काळ संबंधीत शाखेकडुन ओळखपत्र तयार करुन घ्यावे.
३. ओळखपत्र परिधान न करणा-या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
४. प्रत्येक अधिकारी यांनी त्यांचे टेबलवर हलचलपंजी ठेवणे अनिवार्य करण्यात येत आहे.
५. कार्यालया बाहेर जाताना किंवा दौ-यावर जातेवेळी सदरचे हलचल पंजीमध्ये नोंद करुनच कार्यालय सोडावे.
६. ही कार्यपध्दती परिपत्रकाचे दिनांकापासुन प्रभावी राहील.

सदर सुचना सर्व संबंधीतांनी गांभीर्याने घ्याव्यात व कार्यालयीन शिस्तीच्या दृष्टिने याची काटेकोर अंमलबजावणी करावी.

**सत्यम गांधी (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

**प्रति,**

१. ---------------------------------------------- ( विभाग प्रमुख,सर्व) जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती व उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस.
२. गट विकास अधिकारी,पंचायत समिती ------------------------------ (सर्व) उपरोक्त परिपत्रक अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुख यांचे निदर्शणास आणुन देवुन काटेकोर अंमलबजावणीच्या सुचना द्याव्यात.